ISSN 2349-638X

REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

MONTHLY PUBLISH JOURNAL

VOL-II ISSUE-VIII AUGUST 2015

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- editor@aiirjournal.com
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR:– PRAMOD PRAKASHRAO TANDALE

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - II | Issue- VIII | AUGUST | 2015 | Monthly | ISSN 2349-638X

महानुभाव वाङ्मयाची ओळख

जगदंबे रेखाताई शेषराव
के.जी.बी.व्ही.पुर्णा.
जि. परभणी

प्रस्तावना :–

महाराष्ट्र राज्य धर्मसंप्रदायांनी विविधता पुर्ण आहे. नाथपंथ, दत्तपंथ, अवधुत पंथ वारकरी संप्रदाय इत्यादी नावे सांगता येतील. या संप्रदायाबरोबरच महानुभव पंथ हा ही एक महत्वाचा संप्रदाय म्हणुन गणला जातो. या पंथाचे संस्थापक श्रीचक्रधर स्वामी हे मुळचे गुजराथी असून त्यांनी महाराष्ट्रात महानुभवपंथाची स्थापना केली. त्यावेळी देवगिरी येथे यादव राजा रामदेवांची राजवट होती. ही आर्थिकदृष्टया संपन्न होती पण सामाजिक विषमता मोठया प्रमाणात होती. वेगवेगळया धर्मसंप्रदायांची वेगवेगळी दैवते व त्यांची उपासना यांमुळे अंधश्रद्धा वाढीस आलेली होती. यामुळे सामान्य माणसांचा सामाजिक, धार्मिक, आर्थिक कोंडमारा होत असे. अशा परिस्थितीत पारंपारिक सामाजिक विषमता दूर करणे व्रतवैकल्यादी गोष्टींपासून लोकांना दूर करणे हे समाजाच्या हिताचे आहे हे श्रीचक्रधरांनी ओळखल`व त्यांना पटतील असे विचार सामान्यांच्या भाषेतून मराठीतून सांगायला प्रारंभ केला. श्रीचक्रधरांचा बराचकाळ गोदातीराच्या प्रदेशात प्रामुख्याने व्यतीत झाला. तत्वोपदेश हे त्यांच्या विचारांचे व अखंड भ्रमती हे त्यांच्या आचाराचे सुत्र होते. त्यांच्या पश्चात त्यांचा शिष्यवर्ग महानुभव पंथाचे पहिले आचार्य श्रीनागदेव यांच्या मार्गदर्शनाखाली म्हाइंभट्टनावाच्या शिष्याने अत्यंत साक्षेपने व परिश्रमाने श्रीचक्रधरांच्या आठवणी 'लीळाचरित्र' या ग्रंथस्वरूपात संग्रह करून ठेवल्या. हा ग्रंथ महानुभावच नाहीतर मराठी वाङ्मयातील पहिला आद्यग्रंथचरित्रग्रंथ ठरला. सुमारे १२ व्या शतकापासून ते सतराव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत

महानुभावीय वाङ्मय निर्माण झाले व तेवैविध्यपूर्ण समृद्ध आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाच्या दृष्टीने या वाङ्मयाचे स्थान महत्वाचे आहे.

महानुभाव वाङ्मय निर्मितीमागील प्रेरणा :–

यादवकाळात व नंतरकाही शतकेजे वाङ्मय निर्माण झाले. त्यामगची प्रेरणा मुख्यत: धार्मिक स्वरूपाची होती. श्रीज्ञानेश्वरांनी कलिग्रस्त जीवांना मोक्षप्राप्तीचा मार्ग सुकर होण्यासाठी जशी ज्ञानेश्वरी लिहीली त्याचप्रमाण महानुभाव वाङ्मय निर्मितीची भूमिकाही हीच होती. श्रीचक्रधरस्वामींच्या प्रयत्नानंतर म्हाइंभट्टांनी ज्यांनी स्वामींना बघीतले नाही ते स्वामीच्या लिळांचे स्मरण करू शकतील म्हणून नागदेवाचार्यांच्या परवानगीने अत्यंत भक्तिभावपुर्वक श्रीनागदेवाचार्याच्या सहवासात घडलेल्या लीळा लिहून काढल्या. त्याचप्रमाणे स्वामी ज्यांच्या सहवासात आल`होते. त्यांच्याकडे जावून त्यांनी सर्वलीळांचे संकलन केले व लिळाचरित्र ग्रंथाची निर्मिती भक्तीभावनेतून इतरांना तरावयासाठीच झाली हीच प्रेरणा महानुभावांच्या इतर चरित्रग्रंथामागे होती. आणि हेच महानुभाव ग्रंथकारांचे कर्तव्य बनले.

महत्वपूर्ण वाङ्मय निर्मितीचा काळ व त्याचे स्वरूप :–

श्रीचक्रधरस्वामींचा जन्मजरी गुजरातध्ये झाला असला तरी त्यांचेसर्व आयुष्य महाराष्ट्रात गेले. महानुभवपंथाची स्थापना त्यांनी महाराष्ट्रातच केली. सर्वसामान्यांना न कळणा–या संस्कृत भाषेतील धर्मज्ञानापासून वंचीत राहू नये म्हणून स्वामींनी व्यावहारिक वाणीतून त्यांच्यापर्यंत आपले विचार मांडून लोकांना ज्ञानाची, आत्मकर्तव्याची दिशा सांगणे हे त्यांनी जिवीतकार्य मानले म्हणुनच महाराष्ट्राच्या मातीत महानुभवपंथाची बीजेरोवून मराठी भाषेचा पुरस्कार केला. त्यामुळे ही महानुभावांची धर्मभाषाच ठरली.

१२७४ पासून स्वामींच्या प्रयत्नानंतर चार वर्षानी १२७८ मध्ये लीळा म्हणजे आठवणी यात स्वामींच्या दैनंदिन जीवनातील सुमार (१५००) लिळा संकलीत केल्या व लीळाचरित्र या ग्रंथाची निर्मिती केली व हाचग्रंथ महानुभाव वाङ्मय निर्मितीसाठी प्रेरक ठरला. यानंतर म्हाइंभट्टांनी इ. स. १२८८ मध्ये ऋधिपूरलिळा लिहीले यात स्वामींचेगुरू श्रीगोविंदप्रभूयांचे चरित्र होय. श्रीकृष्ण, श्रीदत्तात्रय, श्रीचक्रपाणी, श्रीगोविंदप्रभु, श्रीचक्रधर या पंचकृष्णाचे आठवणीरूपाने चरित्र लिहीणे हे म्हाइंभट्टाने जिवीतकार्य, स्वामींच्या स्मरणभक्तीचे साधन मानले.

याचकालखंडात महानुभांच्या काव्यनिर्मितीलाही सुरूवात झाली. व ती म्हणजे मराठीभाषेतील पहिली काव्यनिर्मिती महदंबेचे घवळे होत. महदंबाही नागदेवाचार्याची चुलत बहीण यांनीही स्वामींकडून दिक्षा घेतली होती. त्याचबरोबरच यांनी कृष्ण रूक्मिणीच्या विवाहाची कथा गायली. १२८४ मध्ये रूक्मिणी स्वयंवर म्हणजेच महदंबेचे धवळे या काव्यग्रंथाची निर्मिती झाली.

श्रीचक्रधरांनी महाराष्ट्रातून प्रयान करण्यापुर्वी पंथाची धुरा श्रीनागदेवांच्या खांद्यावर टाकली. अनेक विद्वानपंडीतांनी त्यांच्या जवळपंथाची दिक्षा घेतली. त्यात केशीराजव्यास, भास्करभट्ट बोरीकर, दामोदर पंडीतचा समावेश होता. इ.स. १३१३ ते १३१५ या काळात श्रीनागदेव व त्यांच्या शिष्य परिवारांचे वर्णनात्मक चरित्रग्रंथ स्मृतिस्थळ हा ग्रंथ लिहीला गेला.

१२९८ मध्ये तीन हजाराहून अधिक ओव्यांचा मुर्तिप्रकाश हाग्रंथ केशीराजांनी लिहीला यात स्वामींच्या मुर्तीचे वर्णन आहे. इ.स. १२९० मध्ये श्रीचक्रधरांनी वेळोवेळी आपल्या शिष्यांना जेसुत्ररूपाने तत्वज्ञान सांगीतले जे केशीराजांनी म्हाइंभट्टांनी लिहिलेल्या लीळाचरित्रातील विचारसुमनांचा सुत्ररूप हार तयार केला तो म्हणजे महानुभावाचे संपुर्ण तत्वज्ञान असलेला अनेक भाष्य ग्रंथाचा मुलाधार असलेला वेदतुल्य ग्रंथ म्हणजे 'सुत्रपाठ' होय.

त्यानंतर १२९० ते १२९१ दरम्यान दृष्टांतपाठ हा संकलनात्मक व टीकात्मक ग्रंथ लिहिला.इ.स. १२९३ मध्ये नरेंद्राचे रूक्मिणी स्वयंवर , इ.स. १२९३ मध्ये भास्करभट्ट बोरीकरांचे शिशुपाळवध व इ.स. १३१२ मध्ये उद्धवगीता, इ.स.१३१६ मध्ये दामोदर पंडीतांचे वच्छहरण व इ.स. १५५३ मध्ये रवळोबासांच सहयाद्रीवर्णन आणि इ.स.१४१८ मध्ये

विश्वनाथांचे ज्ञानप्रबोध व नारायणण्यासबहाळिये यांचे रिद्धपूर वर्णन या सात काव्यग्रंथांची निर्मिती केली गेली. या सात ही काव्य ग्रंथांना विशेष स्थान आहे.

याचा कालावधी १२५ वर्षाचा आहे. ईश्वरी अवतारांचे गुणगाण या काव्यांचा विषय आहे. याशिवाय अनेक प्रकारचे वाङ्मय महानुभवांनी सतराव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत लिहीलेगेले आहे हे सर्व वाङ्मय वैचित्र्यपूर्ण व विविधतेने नटलेले आहे. महानुभावपंथाने मराठी भाषेला शास्त्र काव्याची कसोटी प्राप्त करून दिली.

वरील माहितीवरून आपल्याला महानुभाव वाङ्मयाची ओळख होण्यास मदत मिळेल.

संदर्भ ग्रंथ :–

१. डॉ. आवलगावकर रमेश–सौ. समिक्षा आवलगावकर, महानुभाव साहित्य सौरभ, सर्वज्ञ विद्यापीठ प्रकाशन माळवडगाव, जि. नगर २००३.

२. डॉ. अ. ना. देशपांडे, प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग– १, व्हीनस प्रकाशन, पुणे १९९५.

३. विचारमंथन–संपादक मंडळ–महानुभाव मंडळ नागपूर १९९५.

४. डॉ. आवलगावकर रमेश, महानुभाव संत व वाङ्मय य.च.म.मुक्त विद्यापीठ नाशिक २००१

ISSN 2349-638X
www aiirjournal.com